# कोविड १९ भरतीप्रक्रिया
## जिल्हा एकात्मिक आरोग्य सोसायटी, रायगड
दुरध्वनी क्रमांक ०२१४१ -२२२१५७

रायगड जिल्हातील कोरोना विषाणु (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने मानधन तत्वावर खालील पदासाठी दि. /०१/२०२२ रोजी पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | मानधन | भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | Medical Officer | MBBS with M.C.I.M. Council Registration | 60000 | 9 |
| 2 | Staff Nurse | GNM /Bsc Nursing with M.N.C. Registration | 20000 | 34 |

**सर्वसाधारण अटी व शर्ती–**

१) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

२) सर्व उमेदवारांनी ए – ४ साईज कागदावर **विहीत नमुन्यात** सदर अर्ज टंकलिखीत अथवा संगणकीकृत करणे बंधनकारक राहील. **अर्जाचा नमुना हा जाहीरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला आहे.**

३) अर्जासोबत -

- वयाचा पुरावा
- शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
- शैक्षणिक अर्हतेच्या शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका
- संबंधित पदांकरिता तत्सम कौन्सीलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट) व नुतनीकरण जोडणे बंधनकारक राहील.
- शासकिय/निमशासकीय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र

या प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावीत.

४) उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी नेमणुक देण्यात येणार असुन त्यांची नेमणुक ही दि.३१/०३/२०२२ या कालावधी करिताच नियुक्ती देण्यात येईल. सदर नियुक्ती कोविड १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास किंवा लसीकरण बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५) पदासमोर नमूद मानधन हे एकत्रीत मानधन असून त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

६) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कर्मचाऱ्यांसाठी असणारे करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

७) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) सदर रिक्त पदांची संख्या आवश्यकतेनुसार व राष्ट्रीय आरोग्य सोसायटीच्या सुचनांनुसार कमी-जास्त होऊ शकते याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) पुनर्नियुक्तीबाबत, शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१०) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

११) कोणत्याही उमेदवारांनी या कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवुन कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१२) उमेदवारास सेवाप्रवेशाची किमान वयोमर्यादा किमान वय १८ वर्ष राहिल. वैदयकिय अधिकारी, विशेषतज्ञ व अति विशेषतज्ञ यांचे करिता सेवा प्रवेशाची वयोमर्यादा ७० वर्षापर्यत राहिल. ६० वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्यचिकीत्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. शासकीय कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या

शासकिय कर्मचारी काळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकीय व वित्तिय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कोणत्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी. पॅरॉमेडिकल या पदाची वयोमर्यादा ६५ वर्षाची राहील.

१३) भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचीत मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१४) सदर अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करुन आवश्यकतेनुसार नियुक्ती आदेश देणेत येतील. इच्छुक उमेदवारांनी दि. ०७/०१/२०२२ रोजी पासुन दि. ३१/०१/२०२२ रोजी पर्यंत ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव स्पष्टपणे लिहून **विहीत नमुन्यामध्ये** राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, दुसरा मजला, ओपीडी बिल्डिंग, जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथे अर्ज सादर करावा.

१५) कामावर रुजु होताना आपण सादर केलेली माहितीची आपल्या मुळ कागदपत्रांशी तपासणी होणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास आपले नियुक्ती आदेश रद्द करण्यात येईल याची उमेदवारानी नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करतेवेळेस सादर केलेली माहिती ग्राहय धरणेत येईल.

१६) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.

१७) जसजसे कोविड -१९ साठी तयार केलेली रुग्णालये कार्यान्वित करण्यात येतील किंवा मनुष्यबळाच्या आवश्यकतेनुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

१८) उमेदवारास कोणत्याही प्रकारचे दुर्धर आजार, डायबेटीस, Hypertension, असल्यास अर्ज करु नये. गर्भवती असल्यास स्वतःच्या जबाबदारीवर अर्ज करावा. तसेच गर्भवती असल्यास/झाल्यास कोविड व्यतिरिक्त अन्य कोणतीही कामे देणेत येणार नाही याची नोंद घेणेत यावी.

१९) भरती प्रक्रियेत संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी, रायगड - अलिबाग यांनी राखुन ठेवलेले आहेत.

07/1/2022

**(डॉ. सुहास माने)**
**जिल्हा शल्यचिकीत्सक,**
**रायगड -अलिबाग**